# जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि.१२ : - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्ष व जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता पंडीत दीन दयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे विद्यापीठातील पदवी प्रदान सभागृहात आयोजन करण्यात आले.

यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. पवित्रा पाटील, प्रा. जयदीप साळी, वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागाचे अधिष्ठाता अनिल डोंगरे, जिल्हा कौशल्य विकास व रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सहाय्यक आयुक्त संदीप गायकवाड, अधिसभा सदस्य प्रा. अजय पाटील, प्रा. विशाल पराते, समन्वयक प्रा. उज्ज्वल पाटील, सह समन्वयक आर.आर चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्रा. एस. टी. इंगळे म्हणाले की, गेल्या दोन वर्षांपासून आयोजित करण्यात येत असलेल्या रोजगार मेळाव्याला अत्यंत उत्स्फूर्त आणि सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. रोजगार मेळाव्याकडे केवळ नोकरी मिळविण्याची संधी म्हणून न पाहता, आपल्या करिअर घडविण्याच्या दृष्टीने तो एक महत्त्वाचा टप्पा आहे, अशा दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे. आत्मविश्वास, योग्य कौशल्य, प्रभावी संवाद कौशल्य आणि प्रामाणिकपणे काम करण्याची जिद्द हे गुण विद्यार्थ्यांमध्ये असतील तर तरूण कधीही बेरोजगार राहणार नाहीत. कौशल्य विकासावर भर दिल्यास 'विकसित भारत' ही संकल्पना निश्चितच साकार होईल असे सांगत 'स्किल इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचे काम केले जात असल्याचे देखील ते म्हणाले.

या रोजगार मेळाव्यासाठी महाराष्ट्रासह राज्यातून ३० पेक्षा अधिक कंपन्यांनी सहभाग घेतला होता. युवा शक्ती फाऊंडेशन, नाशिक, हिताची ॲस्टीमो, जळगाव, उत्कर्ष फायनान्स बँक, जळगाव, दास ग्रुप ऑफ  कंपनी, धुळे, जैन इरिगेशन सिस्टीम, जळगाव, पोतदार इंटरनॅशनल सीबीएससी स्कूल, जळगाव, विवेकानंद प्रतिष्ठान स्कूल, जळगाव इ. कंपन्यांचे प्रतिनीधी निवडीसाठी उपस्थित होते. या मेळाव्यासाठी १ हजार ३१५ जणांनी ऑनलाइन पद्धतीने नोंदणी केली होती तर प्रत्यक्ष ६४७ विद्यार्थी  उपस्थित होते. त्यापैकी ३८ विद्यार्थ्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. तर २७२विद्यार्थ्यांची प्राथमिक निवड करण्यात आली आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा कौशल्य विकास व रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सहाय्यक आयुक्त संदीप गायकवाड तर आभार प्रदर्शन प्रा. उज्ज्वल पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सोनाली दायमा, संदीप कुमार यांनी परिश्रम घेतले.

**बातमी क्र. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि.१२: कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील भौतिक शास्त्र शाळा अंतर्गत दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी "फिजिक्स सोसायटीच्या" उद्घाटन व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाची फिरती विज्ञान प्रयोगशाळा विद्यार्थ्यांसाठी विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली.

भौतिकशास्त्र प्रशाळेचे विभागप्रमुख समन्वयक प्रा. संजय एस. घोष यांच्या पुढाकारातून ही फिरती विज्ञान प्रयोगशाळा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आली. कार्यक्रमावेळी भौतिकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. जयदीप व्ही. साळी, प्रमुख मार्गदर्शक प्रा. दर्शन जोशी, प्रा. अप्रतिम चॅटर्जी यांनी फिरत्या विज्ञान प्रयोगशाळा भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांतील सुमारे २०० विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले होते. मयूर वंदे, मयूरी गिरासे, पल्लवी चौधरी व रोहित भोई यांनी विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, रसायनशास्त्र आणि संगणकशास्त्र या विषयांतील एकूण ३० शैक्षणिक प्रयोगांचे प्रात्यक्षिक सादर करून सविस्तर मार्गदर्शन केले.

या फिरत्या विज्ञान प्रयोगशाळेमुळे ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक प्रयोगशाळेचा प्रत्यक्ष अनुभव मिळत असून विज्ञानाविषयीची आवड व जिज्ञासा वाढीस लागते, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. प्रत्यक्ष प्रयोगांद्वारे संकल्पना समजावून घेतल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची प्रेरणा निर्माण होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १२ फेब्रुवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता